# ब्लॉग बंद करण्याचा अण्णांचा निर्णय

## 'त्यांचे' फोन टॅप होत आहेत : केजरीवाल ■ परुळेकरांच्या पत्राने नवीन अडचण

नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

कोअर कमिटीत बदल करण्याचे माझ्या मनात होते. पण तो माझा निर्णय नव्हता, असे म्हणत अण्णांनी हा ब्लॉग बंद करण्याचा निर्णय जिथल्यातिथे घेतला. पत्रकार राजू परुळेकर यांनी आज सकाळी अण्णांचे पत्र ब्लॉगवर टाकल्यानंतर टीम अण्णा अडचणीत आली होती. अखेर उत्तर देऊ न शकल्याने अण्णांनी हा निर्णय जाहीर करून टाकला.

आमच्या टीममधील किरण बेदी आणि प्रशांत भूषण यांच्यावर आरोप होत असल्याने माझ्या मनात अनेक विचार येत होते. पण काही दिवसांनी माझ्या लक्षात आले की, हे सारे आमची टीम फोडण्यासाठी केले जात आहे. म्हणून टीममध्ये बदल करण्यात आला नाही, असे स्पष्टीकरण अण्णांनी दिले.

माझ्या मनात येणारे विचार मी कधीकधी लिहून ठेवतो. पण त्यात लिहिलेले विचार हा माझा निर्णय असेलच असे नाही. जर त्यावर माझी सही असेल तरच तो माझा निर्णय आहे असे समजावे, असे सांगत अण्णांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला.

परुळेकर यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रावर सही नसेल तर तो माझा निर्णय मानता येणार नाही. पण सही असेल तर नंतर स्पष्टीकरण देईल, असेही त्यांनी सांगितले.

त्या पत्रातील अक्षर अण्णा तुमचेच आहे, असे वाटते म्हटल्यावर अण्णा चिडले. हा आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे आणि त्यामुळे मी ब्लॉग बंदच करून टाकतो, अशी थेट घोषणा अण्णांनी केली. पुढच्या एकाही प्रश्नाचे उत्तर न देता अण्णा तडक निघून गेले. टीम अण्णांचे मुख्य सदस्य अरविंद केजरीवाल यांनी सरकारी संस्थाकडून अण्णा हजारेंचे फोन टॅप करण्यात येत असल्याचा आरोप केला आहे.

'गोवा थिंक टँक फेस्ट कॉन्क्लेव'मध्ये सहभागी होण्यासाठी आलेले केजरीवाल यांनी सांगितले की, त्यांचे आणि अण्णांचे आणखी एक सहकारी यांच्यातील टेलिफोनवरील संभाषण दिल्ली पोलिसांनी रेकॉर्ड केले आहे.

ते म्हणाले की, अण्णाचा एक संदेश त्यांच्या सहकाऱ्याने मला फोनवर ऐकवला. अण्णांना राजघाटवर जाऊन १५ मिनिटे बसायचे होते. ही माहिती त्यांना कुणाला सांगायची नव्हती. आमचे बोलणे संपताच १५ मिनिटांच्या आत दिल्ली पोलिसांकडून मला फोन आला आणि राजघाटवर अण्णांची काय योजना आहे याची चौकशी करण्यात आली. जे लोक राष्ट्रद्रोही आहेत त्यांचे फोन ते टॅप करू शकतात.



### ब्लॉगवरचे पत्र खरे मानावे काय? अण्णांच्या स्वाक्षरीवरुन संभ्रम

अण्णा हजारे यांच्या ब्लॉगवर त्यांचे ब्लॉगर राजू परुळेकर यांनी अण्णांचे पत्र टाकले आहे. परुळेकर यांनी लिहिलेल्या या ब्लॉगवरून वादळ निर्माण झाले आहे. परंतु, मुळात या पत्रावरूनच संभ्रम निर्माण झाला आहे. अण्णांनी या वादासंदर्भात केलेल्या खुलाशानुसार त्यांची स्वाक्षरी असेल तरच ते पत्र ग्राह्य धरावे. ब्लॉगवर टाकलेल्या पत्रातही अण्णांची स्वाक्षरी आहे. परंतु, आधीच्या पत्रांमध्ये असलेली अण्णांची स्वाक्षरी आणि या पत्रात केलेली स्वाक्षरी वेगळी आहे. अण्णांनी २ नोव्हेंबरला पंतप्रधानांना पत्र लिहिले होते. त्या पत्रातील स्वाक्षरी पूर्णपणे वेगळी आहे. आज ब्लॉगवर टाकण्यात आलेल्या पत्रात फक्त नावच लिहिले आहे. एवढेच नाही तर ब्लॉगवरील आधीच्या पोस्टमध्ये टाकलेल्या पत्रांमध्ये अण्णांची स्वाक्षरीच नाही. अनेक पत्रांमध्ये अण्णा 'कि. बा. हजारे' अशी स्वाक्षरी करतात. याउलट ब्लॉग पोस्टवरील पत्रात फक्त 'अण्णा हजारे' एवढेच लिहिलेले आहे. त्यामुळे ते पत्र ब्लॉगवर प्रसिद्ध करण्यासाठी दिलेले होते, जे ब्लॉगवर न टाकण्यास सुरेश पठारे यांनी सांगितले होते, अथवा अण्णांनी फक्त लिहिलेले मुद्दे आणि विचार होते, यासंदर्भात आता संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.